मराठी साप्ताहिक

# युवाशक्ती एक्सप्रेस

RNI No. MAHMAR/2016/72543



सौ. रुबिना मुल्ला
कार्यकारी संपादिका
मो-९८९०८७९७५७

वर्ष ७ वे | अंक :०६ | रविवार ११ मे ते १७ मे २०२५ | किंमत रू. १/- | पृष्ठ : ४

पान २ संपादकीय — संसद नव्हे, संविधानच!...
पान ३ — पंचायत समिती आणि पालिका...
पान ४ — कुंडलीत मृत्यूयोग...




## वसईतील क्षितिज रिसॉर्टला महसूल विभागाचे अभय ?

### मंडळ अधिकाऱ्यांचे निष्कासनाचे आदेश फाट्यावर ! कारवाई होणार ?

वसईतील सत्पाळा येथील क्षितिज रिसॉर्टचे बांधकाम अनधिकृतपणे शासकीय जागेत केलेले असल्याने सदर बांधकाम निष्कसनाचे आदेश तहसीलदार महसूल विभागाला प्राप्त झालेले असतानाही संबंधित महसूल विभागाचे अधिकारी या रिसॉर्टच्या बांधकाम पाडण्यास टाळाटाळ करीत असल्याची खळबळजनक बाब उघड झाली आहे.त्यामुळे शासन निणऱ्याची पायम्मली होत असल्याने महसूल विभागाच्या अधिकाऱ्यांवर कारवाईची मागणी नागरिकांकडून होत आहे.मिळालेल्या माहितीनुसार,मौजे सत्पाळा येथील स.नं/ही.नं ८७ या शासकीय जागेत क्षितिज रिसॉर्टचे बांधकाम अनधिकृतपणे उभारण्यात आले आहे.दरम्यान सदर अवैधपणे उभारलेले बांधकाम निष्कासनाचे आदेश आगाशी मंडळ अधिकारी यांनी ३० जुलै २०२४ रोजी महसूल विभागाला दिले आहेत.त्यानुषंगाने ११ फेब्रुवारी २०२५ रोजी बांधकाम निष्कासनाची तारीख निश्चित करण्यात आली आहे.

परंतु असे असतानाही महसूल अधिकाऱ्यांनी क्षितिज रिसॉर्टची प्रत्यक्ष पाहणी करूनही सदर ठिकाणी बांधकाम निष्कासनाची कारवाई केलेली नाही.त्यामुळे सदर बांधकामात क्षितिज रिसॉर्टच्या मालकासह महसूल विभागाच्या अधिकाऱ्यांमध्ये आर्थिक साटेलोटे असल्याची उलटसुलट चर्चा नागरिकांमध्ये सुरू आहे.तसेच या बांधकामावर तोडक कारवाई होणार का ? असा सवाल नागरिकांमधून उपस्थित केला जात असून या कारवाईकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.






## सत्पाळा ग्रामपंचायतीचे सरपंच, उपसरपंच सह सदस्य अपात्र अतिरिक्त विभागीय कोकण आयुक्तांचा आदेश..

नालासोपाराः- वसई तालुक्यातील सत्पाळा ग्रामपंचायत विविध प्रकरणामुळे नेहमीच चर्चेत राहिली आहे. आता ग्रामपंचायत सरपंच उपसरपंच सह सदस्यांच्या मालमत्ता कराच्या थकबाकी प्रकरणात मोठी कारवाई करण्यात आली आहे. ग्रामपंचायत माजी सरपंच अनिल ठाकूर ह्यांनी ह्या प्रकरणाची तक्रार करुन सतत पाठपुरावा केला होता. अखेर त्यांच्या सततच्या पाठपुराव्याला यश मिळाले आहे. सरपंच, उपसरपंच व सदस्य हे अपात्र ठरले आहेत. अतिरिक्त विभागीय कोकण आयुक्तांनी दिलेल्या ह्या निणऱ्यामुळे वसई तालुक्यात खळबळ उडाली आहे.

सरपंच संगिता मेघराज भंडार, उपसरपंच उमेश सदानंद पाटील, सदस्य कविता उमेश पाटील, गीता ज्ञानेश्वर ठाकुर, राहुल सुधाकर किणी, मनोज भरत वरठा हे सर्व अपात्र ठरलेले आहेत. या सर्वांनी विहित मुदतीत मालमत्ता कराचा भरणा न केल्याने, महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम १९५८ मधील कलम १४(१) ह नुसार त्यांना सदस्य पदासाठी अपात्र घोषित करण्यात आले पान नं२






# संपादकीय...!

## संसद नव्हे, संविधानच!...

सर्वोच्च न्यायालयाने संविधानाचे सर्वश्रेष्ठत्व अधोरेखित केलं आहे. न्यायालयाने स्पष्ट केलं की, कायद्याचे निणऱ्य राजकीय विचारांवर अवलंबून नस्तात. खासदार दुबे यांच्या आरोपांवर न्यायालयाने हे उत्तर दिलं. न्यायपालिकेवर लोकांचा विश्वास असणं आवश्यक आहे. न्यायाधीशांवरील भ्रष्टाचाराच्या आरोपांमुळे लोकांमध्ये शंका निर्माण झाली आहे.देशाच्या लोकशाही चौकटीतील सर्वोच्च स्थानाबाबतच्या जुन्या तंट्याला तूर्त पूर्णविराम मिळाला. न्यायपालिका आणि संसद या लोकशाहीतील दोन मजबूत स्तंभांमध्ये हा दृश्य-अदृश्य संघर्ष पूर्वापार चालला आहे. देशातील नागरिकांनी निवडलेले लोकप्रतिनिधींचे व्यासपीठ असल्याने संसदेचे सर्वोच्च स्थान अबाधित असावे, ही झाली नेतेमंडळींची अपेक्षा. सामान्य नागरिकांच्या महत्त्व आणि ममत्वाचा कौल संविधानाकडेच झुकलेला असतो. भारतीय संविधानाचे अमृत महोत्सवी वर्ष सुरू असताना सर्वोच्च न्यायालयाने एका ऐतिहासिक निणऱ्याद्वारे संविधानाचे सर्वश्रेष्ठत्व अधोरेखित केले. न्यायाची समीक्षा करण्याची जबाबदारी संविधानाने न्यायपालिकेला प्रदान केली असून न्यायालये परीक्षण करताना संविधानाच्या चौकटीतच कार्य करीत असतात, या तथ्याचा न्यायालयाने पुनरुच्चार केला. कायदेशीर तत्त्व हाच न्यायालयीन निणऱ्यांचा आधार असतो. राजकीय, धार्मिक वा सामूहिक विचारांवर निकाल अवलंबून नसतो, ही न्यायालयाची स्पष्टोक्ती महत्त्वाची आहे. खटल्यांची सुनावणी हे संवैधानिक कर्तव्य असल्याचे सांगतानाच न्यायालयात जाणे हा लोकांचा कायदेशीर अधिकार असल्याच्या वास्तवाकडेही सर्वोच्च न्यायालयाने लक्ष वेधले.भारतीय जनता पक्षाचे खासदार निशिकांत दुबे यांनी सर्वोच्च न्यायालयावर अराजकतेकडे नेण्याचा आरोप करतानाच सरन्यायाधीशांवरही टीका केली होती. राज्यपालांनी पाठवलेल्या विधेयकांवर राष्ट्रपतींना ठरावीक मुदत घालून देण्याच्या सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशांवर उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांनीही अलीकडेच परखड टीका केली होती. लोकशाही व्यवस्थेत संसदच सर्वोच्च असल्याच्या मताचा त्यांनी पुनरुच्चार केला होता. न्यायाधीश यशवंत वर्मा यांच्या निवासस्थानी लागलेल्या आगीच्या घटनेवेळी कोट्यवधीची रोख सापडल्यानंतरही कारवाईला झालेल्या विलंबाबद्दल नाराजी दर्शविताना धनखड यांनी न्यायपालिकेबद्दल थेट संशय व्यक्त केला.खासदार दुबे यांचे आरोप तसेच उपराष्ट्रपतींनी केलेल्या संत्रस्त वक्तव्याच्या पार्श्वभूमीवर सर्वोच्च न्यायालयाकडून संसद नव्हे, तर संविधानाचे स्थान देशात सर्वश्रेष्ठ असल्याचा थेट निणऱ्य आला. द्वेष पसरविण्याचा प्रयत्न करणारी प्रकरणे कठोरतेने हाताळण्याचा संकल्प न्यायालयाच्या निणऱ्यातून झळकला. सरन्यायाधीश संजीव खन्ना आणि न्या. संयजकुमार यांच्या खंडपीठाने दिलेल्या निर्देशांनी लोकशाही संरचनेची ठेवण लक्षात आणून दिली. अर्थात, न्यायपालिकेविषयी श्रद्धा बाळगणाऱ्या देशातील सामान्यांच्या मनात काही किंतु दडले असल्याच्या वास्तवाकडेही लक्ष द्यायला हवे. न्यायाधीशांवर होणारे भ्रष्टाचाराचे आरोप आणि या व्यवस्थेतील न्यूनत्वाने विश्वसनीयता संशयात सापडली आहे.न्या. यशवंत वर्मा यांच्या घरात जळालेल्या नोटांचे घबाड गवसल्यानंतर लोकमनांतील साशंकता उफाळून आली. समानता आणि स्वातंत्र्याच्या सोबतीने न्यायाला विराजमान करायचे असल्यास नागरिकांचा विश्वास पुनर्संपादित करावा लागेल. न्यायालयीन रिक्त पदांनी; तसेच खटल्यांच्या संथगतीनेही सर्वांना व्यथित केले आहे. आभासी सुनावणी आणि डिजिटल प्रक्रियेची मदत घेतल्यानंतरही सद्यस्थितीत देशभरात अंदाजे पावणेपाच कोटी खटले रेंगाळले आहेत. त्यातील सर्वोच्च न्यायालयातील संख्या ऐंशी हजारांहून अधिक आहे. त्वरित न्यायासाठी लोकांनी गैरप्रकारांचा अवलंब केल्यास त्याचा दोष व्यवस्थेवर जाईल.पारदर्शकता तसेच ठरावीक मुदतीचा ‘न्याय’ अशा ठिकाणी लागू न झाल्याने लोकमनांतील असंतोष वाढतो. वर्मा यांच्या प्रकरणानंतर देशातील सर्वोच्च न्यायालयाच्या २७ न्यायमूर्तींनी स्वतःच्या संपत्तीची घोषणा करून चांगला पायंडा निर्माण केला. या न्यायमूर्तींची संपत्ती आता देशवासीय एका क्लिकवर बघू शकतील. ही पारदर्शकता लोकशाहीच्या चारही स्तंभांमध्ये निर्माण झाली तर लोकक्षोभ कमी होऊ शकेल. संविधानातील नियमांमधून नेमकी तीच अपेक्षा व्यक्त झाली आहे. ‘संसद नव्हे, संविधानच’ हा सर्वश्रेष्ठतेचा निःसंदिग्ध न्याय आल्याने चारही स्तंभांकडून लोकशाहीच्या जपणुकीचे पारदर्शी प्रयत्न व्हायला हवेत. कोणताही देश केवळ नियम, निकष वा न्यायालयीन निणऱ्यांवर नव्हे, तर लोकविश्वासावर चालतो या सर्वोच्च तथ्याचे विस्मरण होता कामा नये.

## सत्पाळा ग्रामपंचायतीचे..पान नं. १

आहे. या प्रकरणी माजी सरपंच अनिल ठाकुर यांनी अतिरिक्त विभागीय कोकण आयुक्तांकडे याचिका दाखल केली होती. या याचिकेवर सुनावणी करताना अपिलार्थी यांचा दावा ग्राह्य धरला. त्यांनी मालमत्ता कर थकवल्यास संबंधित व्यक्ती ग्रामपंचायत सदस्य राहू शकत नाही असा आदेश दिला आहे.

## नौदलातून सेवानिवृत्त, ७६ व्या ..पान नं. ३

निकाल ९४.०८ टक्के होता. यंदा निकालात घसरण झाली. असे असले तरी राज्यभरातील नऊ विभागांमध्ये छत्रपती संभाजीनगर चौथ्या क्रमांकावर आहे. तर राज्याच्या एकूण निकालातही घसरण झाली आहे. फेब्रुवारी-मार्च २०२४ चा निकाल ९३.३७ टक्के होतो. या तुलनेत फेब्रुवारी-मार्च २०२५ चा निकाल १.४९ टक्क्यांनी कमी आहे. राज्यात निकालात यंदाही कोकण विभागाने बाजी मारली, तर सर्वात कमी निकाल लातूर विभागाचा आहे.

## मुंबई शिक्षक मतदार संघातील उबाठा गटाचे

### आमदार जे एम अभ्यंकर यांचा अर्ज मा मुंबई हायकोर्टाने फेटाळला.

मुंबई शिक्षक मतदार संघात जून २०२४ रोजी झालेल्या निवडणुकीत उबाठा गटाचे उमेदवार श्री जे एम अभ्यंकर विजयी झाले होते. दुसऱ्या क्रमांकावरील शिक्षक भारतीचे उमेदवार सुभाष सावित्री किसन मोरे यांनी या निकालाला मा हायकोर्टात निवडणूक याचिका दाखल करून आव्हान दिले होते. परंतु उबाठा गटाचे उमेदवार श्री अभ्यंकर यांनी श्री सुभाष मोरे यांची याचिका फेटाळण्याची मागणी अर्जाद्वारे मा. हायकोर्टाकडे केली होती. मा हायकोर्टात १९ मार्च २०२५ रोजी झालेल्या युक्तिवादा दरम्यान श्री अभ्यंकर यांच्या वतीने ज्येष्ठ वकील श्री एम एम वशी यांनी श्री सुभाष मोरे यांची निवडणूक याचिका फेटाळली जावी यासाठी युक्तिवाद केला होता. दोन्ही बाजूंनी युक्तिवाद झाल्यावर न्यायाधीश श्रीमती गौरी गोडसे यांनी निकाल राखून ठेवला होता.

दिनांक ९ मे २०२५ रोजी मा हायकोर्टाच्या न्यायमूर्ती श्रीमती गौरी गोडसे यांनी आमदार अभ्यंकर यांचा निवडणूक याचिका रद्द करण्याची मागणी करणारा अर्ज फेटाळला. तसेच सुभाष मोरे यांनी दाखल केलेल्या निवडणूक याचिकेवर सुनावणी घेण्याचा निणऱ्य दिला आहे. श्री सुभाष मोरे यांच्या वतीने ज्येष्ठ वकील श्री राजीव पाटील आणि श्री सचिन पुंदे यांनी मा हायकोर्टात बाजू मांडली होती.

**सुभाष मोरे यांच्या याचिकेत काय आहे?**

मुंबई शिक्षक मतदार संघाचा निकाल १ जुलै २०२४ रोजी जाहीर झाला. या निवडणुकीत पहिल्या फेरीच्या मतमोजणी दरम्यान विजयी उमेदवार श्री अभ्यंकर यांना ३०७९ मते तर श्री सुभाष मोरे यांना ३०११ मते मिळाली. दोन्ही उमेदवारांमध्ये केवळ ६८ मतांचा फरक होता. हा फरक शेवटून दुसऱ्या फेरीत २०८ मतापर्यंत गेला. श्री सुभाष मोरे यांनी दाखल केलेल्या याचिकेत श्री जे अभ्यंकर यांनी आपल्या पदाचा गैरवापर करून मुख्याध्यापकामार्फत ५८७ अपात्र मतदारांची नोंदणी केल्याचा आरोप केला आहे. तसेच या अपात्र मतदारांमध्ये प्लेग्रुप, मॉन्टेंसरी, पूर्व प्राथमिक, प्राथमिक आणि काही शिक्षकेतर कर्मचारी यांची नोंदणी करण्यात आली आहे. काही मतदार असे आहेत की ज्यांचे वय १८ ते २५ वर्ष असून त्यांना किमान तीन वर्षाचा शिकवण्याचा अनुभव नाही. श्री अभ्यंकर सल्लागार असलेल्या अथवा विश्वस्त मंडळात असलेल्या शाळांमधून अपात्र मतदारांची नोंदणी झालेली असल्यामुळे श्री अभ्यंकर यांची निवड रद्द करून दुसऱ्या क्रमांकावरील उमेदवार श्री सुभाष मोरे यांना विजयी करावे अशी मागणी याचिकेत केलेली आहे. मा हायकोर्टाने श्री सुभाष मोरे यांची याचिका दाखल करून त्यांनी याचिकेद्वारे केलेल्या आरोपांची शहानिशा करण्याचे मान्य केले आहे.

**मा हायकोर्टाचे मत**

'the pleadings in the petition indicate sufficient material particulars regarding the objections raised to the alleged illegal addition of the ineligible persons as electors. The averments, if proved, will materially affect the election result. Thus the material particulars pleaded in the petition would constitute a sufficient cause of action that warrants a trial. Hence, the eletion petition cannot be rejected at the threshold under order VII Rule 11 of CPC.

**माजी आमदार कपिल पाटील यांची प्रतिक्रिया**

उबाठा गटाचे आमदार अभ्यंकर यांनी नोंदविलेले ५८७ अपात्र मतदार वगळल्यास मुंबई शिक्षक मतदार संघातून सुभाष मोरे यांचा विजय स्पष्ट आहे. मुंबईतील शिक्षकांनी नेहमीच शिक्षक भारती संघटनेवर विश्वास दाखविला आहे. मुंबईतील शिक्षकांना मा हायकोर्टात न्याय मिळेल याची खात्री आहे अशी प्रतिक्रिया माजी आमदार कपिल पाटील यांनी दिली.

आता बातमी वेबपोर्टलवर...

बहुजन महा VIEWS & NEWS

www.bahujanmahaviewsandnews.in

# पंचायत समिती आणि पालिका निवडणुकांचा मार्ग मोकळा, ४ आठवड्यात होणार घोषणा

महाराष्ट्रातील अनेक स्थानिक स्वराज्य संस्थांची मुदत संपून साधारणतः तीन वर्षं झाले तरी निवडणुका झालेल्या नाहीत. त्यावर सुप्रीम कोर्टाने राज्य निवडणूक आयोगाला आदेश देत पुढील चार आठवड्यात निवडणुका घोषित करण्याचे निर्देश दिले आहेत. तसेच पूर्ण प्रक्रिया चार महिन्यात संपवावी असे देखील सर्वोच्च न्यायालयाने सूचित केले आहे.

'स्थानिक पातळीवर लोकशाही बळकट राहावी यासाठी राज्यघटनेनी दिलेले निर्देश पाळणे आवश्यक आहे. त्यानुसार नियमितपणे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका व्हाव्यात, या निर्देशांचा आदर व्हायला हवा,' असे मत घटनापीठाचे प्रमुख न्या. सूर्य कांत यांनी निकालाचे वाचन करताना दिले.

ओबीसी आरक्षणासंदर्भात असलेल्या प्रलंबित खटल्यांमुळे निवडणुका झाल्या नसल्याची दखल सुप्रीम कोर्टाने घेतली आहे.राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्था गेल्या दोन ते चार वर्षांपासून प्रशासकांच्या हाती आहेत. २९ महागनरपालिका, २५७ नगरपालिका, २६ जिल्हा परिषद आणि २८९ पंचायत समित्यांचा गाडा प्रशासक हाकत आहेत.

सुरुवातीला कोरोना, प्रभाग रचना आणि नंतर ओबीसीच्या राजकीय आरक्षणाच्या मुद्द्यामुळे या निवडणुका लांबलेल्या आहेत.

'ओबीसींचं पूर्ण आरक्षण लागू असणार' - देवेंद्र फडणवीस

सुप्रीम कोर्टाच्या आदेशानंतर राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, 'सुप्रीम कोर्टानं ४ महिन्यांमध्ये स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घेण्यासंदर्भात आम्हाला परवानगी दिली. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाचं आम्ही स्वागत करतो. निवडणूक आयोगानं तत्काळ या संदर्भात तयारी करावी, यासाठी आयोगाला विनंती करणार आहोत.

'निवडणूक आयोगानं आमची अजून एक मागणी मान्य केलेली आहे. ओबीसी आरक्षणाच्या संदर्भात बांठिया आयोगाच्या पूर्वीची स्थिती असणार आहे. त्यामुळे या निवडणुकांमध्ये ओबीसींचं पूर्ण आरक्षण लागू असणार आहे,' फडणवीस यांनी सांगितलं.राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष (शरद पवार गट) जयंत पाटील यांनीही याबाबत प्रतिक्रिया दिली आहे.

सुप्रीम कोर्टाच्या निर्णयाबाबत बोलताना ते म्हणाले, 'ओबीसी आरक्षणाबाबतच्या सर्वोच्च न्यायालयाच्या अंतिम आदेशाच्या अधीन राहून या निवडणुका होतील. राज्यातील सर्वच राजकीय पक्षातील कार्यकर्त्यांसाठी या निवडणुका गरजेच्या आहेत. ३ वर्षांच्या विलंबाने का होईना,

नवीन नेतृत्व तयार होण्यासाठी आणि लोकशाही जिवंत ठेवण्यासाठी महत्वाच्या असणाऱ्या या निवडणुका घेण्याचा आदेश दिल्याबद्दल मी आमच्या पक्षाच्या वतीने देशाच्या सर्वोच्च न्यायालयाचे आभार मानतो.'

जयंत पाटील पुढे म्हणाले, 'सर्वोच्च न्यायालयाने आदेश देताना निवडणूक आयोगास आवश्यकता भासल्यास निवडणूक घेण्याबाबत मुदतवाढ घेण्याची मुभा दिलेली आहे. राज्य सरकारने निवडणूक आयोगाच्या आडून निवडणुका घेण्यास चालढकल करू नये अशीच आमची अपेक्षा आहे.'सुप्रीम कोर्टाच्या निर्णयावर ओबीसी नेते काय म्हणाले?राष्ट्रवादीचे नेते छगन भुजबळ माध्यमांशी बोलताना म्हणाले, 'आज आम्हा सगळ्यांसाठी आनंदाचा दिवस आहे. ओबीसी आणि भटक्या विमुक्तांसाठी ही अत्यंत चांगली बाब आहे. या निवडणुका अखेर होणार आहेत हे महत्त्वाचं आहे. मागच्या वेळेला ज्या ९२ ठिकाणी निवडणुका झाल्या तिथे आम्हाला शून्य आरक्षण मिळालं. कारण सुप्रीम कोर्टाने आम्हाला आरक्षण न देता निवडणुका घेण्याचे आदेश दिले होते. मी यासंदर्भात मुख्यमंत्र्यांना भेटलो होतो. बांठिया आयोगाने अतिशय चुकीचं सर्वेक्षण केलेलं होतं. मग आम्ही महात्मा फुले समता परिषदेच्या माध्यमातून वकील उभे केले.'

सुप्रीम कोर्टाच्या निकालावर बोलताना ओबीसी नेते लक्ष्मण हाके यांनी बीबीसी मराठीला सांगितलं, 'स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत १९९४ ते २०२२पर्यंत ज्या पद्धतीने ओबीसींना आरक्षण मिळत होतं, त्याच पद्धतीने निवडणुका घेण्यास सुप्रीम कोर्टाने मंजुरी दिली आहे. या निर्णयाचं मी हार्दिक स्वागत करतो. सुप्रीम कोर्टाच्या निर्णयामुळे ओबीसी समाजाला न्याय मिळणार आहे.'

लक्ष्मण हाके पुढे म्हणाले, 'सर्वोच्च न्यायालयाने तात्पुरता का होईना ओबीसींना दिलासा दिलेला आहे. पण गेल्या काही महिन्यांमध्ये ८ लाख २५ हजारांहून जास्त कुणबी प्रमाणपत्र जर दिली गेलेली असतील आणि अशी प्रमाणपत्रं मिळवलेली माणसं उद्या ग्रामपंचायत, पंचायत समिती, जिल्हा परिषद, नगर परिषद, महापालिकेत निवडणुकीला उभे राहणार असतील तर याविरुद्ध आम्ही उभं राहणार आहोत. ज्यांच्यासोबत सामाजिक भेदभाव झाला, जो समाज बलुत्यामध्ये येतो, जो भटका विमुक्त आहे त्यांचा पहिला हक्क या आरक्षणावर आहे. जर बोगस कुणबी प्रमाणपत्राच्या आधारे लोक या निवडणुकीत ओबीसीच्या जागेवर उभे राहिले तर आम्ही विरोध करू.'सुप्रीम कोर्टाने बांठिया आयोगाच्या आधीचं ओबीसी आरक्षण कायम ठेवत निवडणूका घेण्याचे आदेश दिले आहेत.

याबाबत बोलताना ओबीसी नेते आणि माजी आमदार प्रकाश शेंडगे म्हणाले, 'आज ओबीसीच्या आरक्षणाविषयी सुप्रीम कोर्टाने महत्त्वाचा निर्णय दिलेला आहे. गेल्या तीन-चार वर्षांपासून रखडलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका आणि ओबीसीच्या कमी झालेल्या जागा यावरच संकट दूर झालं आहे. आधी मिळत होतं त्याप्रमाणे २७ टक्के आरक्षण आता ओबीसींना मिळणार आहे. ओबीसी समाजाच्या कार्यकर्त्यांना राजकीय आरक्षण घेता येणार आहे. या निर्णयाचं आम्ही स्वागत करतो.'

कोणत्या निवडणुका प्रलंबित?

या महानगरपालिका निवडणुका प्रलंबित

मुंबई, ठाणे, नवी मुंबई, पनवेल, कल्याण - डोंबिवली, उल्हासनगर , भिवंडी-निजामपूर, वसई- विरार, मिरा-भाईंदर, पुणे, पिंपरी-चिंचवड, सोलापूर, कोल्हापूर, नाशिक, मालेगाव, अकोला, अमरावती, नागपूर, चंद्रपूर, संभाजीनगर, नांदेड, लातूर, परभणी

या जिल्हा परिषद निवडणुका प्रलंबित

रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, नाशिक, जळगाव, अहमदनगर, पुणे, सातारा, सांगली, कोल्हापूर, सोलापूर जालना, परभणी, हिंगोली, बीड, नांदेड, धाराशिव, लातूर, अमरावती, यवतमाळ, चंद्रपूर, वर्धा

जिल्हा परिषदा, पंचायत समित्यांच्या निवडणुकाही नाहीत

राज्यात स्थानिक स्वराज्य संस्थांची एकूण सदस्य संख्या अडीच लाख आहे. त्यामध्ये २७,९०० ग्रामपंचायतीमधील सदस्यांचा समावेश आहे.

राज्यातील एकूण २९ महापालिकांच्या निवडणुका दोन ते चार वर्षांपासून रखडलेल्या आहेत.

यामध्ये नवनिर्मित जालना व इचलकरंजी महापालिकेची अद्याप पहिली निवडणूकही झालेली नाही.

सर्व ठिकाणी आयुक्तच प्रशासक म्हणून कारभार चालवत आहेत.

तसेच फेब्रुवारी २०२५ अखेर आणखी सहा जिल्हा परिषदा आणि ४४ पंचायत समित्यांची मुदत संपली. अशाच प्रकारे १५०० ग्रामपंचायतींमध्येही सध्या प्रशासकीय व्यवस्था आहे.

# नौदलातून सेवानिवृत्त, ७६ व्या वर्षी आजोबांनी पुन्हा ठरवलं, बारावी पहिल्याच प्रयत्नात पास, LLB ही करण्याचा ध्यास

गोरखनाथ मोरे हे भारतीय नौदलातून सेवानिवृत्तीनंतर कन्या डॉ. आरती मोरे यांच्यासह ते सध्या नायगावला राहतात. दहावी पास असलेल्या मोरे यांना शिकण्याची आवड असल्याने त्यांनी पुढील शिक्षणाची इच्छा मुलीसमोर व्यक्त केली.वसई : शिक्षणासाठी वयाची मर्यादा नसते.. हे वाक्य सत्यात उतरवले आहे नायगाव पश्चिमेकडील एका ७६ वर्षीय आजोबांनी. गोरखनाथ मोरे (७६) यांनी नुकतीच बारावीची परीक्षा ४५ टक्के गुणांसह उत्तीर्ण करून नवे उदाहरण समाजापुढे ठेवले आहे. त्यांचे संपूर्ण वसई तालुक्यातून कौतुक होत आहे.

गोरखनाथ मोरे हे भारतीय नौदलातून सेवानिवृत्तीनंतर कन्या डॉ. आरती मोरे यांच्यासह ते सध्या नायगावला राहतात. दहावी पास असलेल्या मोरे यांना शिकण्याची आवड असल्याने त्यांनी पुढील शिक्षणाची इच्छा मुलीसमोर व्यक्त केली. नायगाव येथील ऋषी वाल्मिकी ज्युनियर कॉलेजचे संस्थापक अध्यक्ष रवींद्र भाटकर यांनी त्यांना मार्गदर्श करत, १७ क्रमांकाचा फॉर्म भरून घेतला.तोंडी परीक्षा दिल्यावर, वसईतील न्यू इंग्लिश स्कुल आणि ज्युनियर कॉलेज या परीक्षा केंद्रावर जात त्यांनी परीक्षा दिली आणि



MAHARASHTRA STATE BOARD OF SECONDARY & HIGHER SECONDARY EDUCATION PUNE
HSC EXAMINATION RESULT FEBRUARY 2025
RESULT

Name : MORE GORAKHNATH SUPADU
Mother : GANGUBAI
Seat No. : M148157
Division : MUMBAI

| SUBJECT CODE | SUBJECT NAME | MARKS OBTAINED |
|---|---|---|
| 01 | ENGLISH | 035 |
| 02 | MARATHI | 048 |
| 38 | HISTORY | 039 |
| 39 | GEOGRAPHY | 053 |
| 48 | PSYCHOLOGY | 050 |
| 49 | ECONOMICS | 042 |

TOTAL : 267/600
PERCENTAGE : 44.50
RESULT : PASS



पहिल्याच प्रयत्नात ते यशस्वी झाले. त्यांना पुढे एलएलबी शिकण्याची इच्छा आहे. यासाठी त्यांनी बारावीची परीक्षा उत्तीर्ण करत पहिले पाऊल टाकले.निकालानंतर विद्यार्थ्यांनी मित्र-मैत्रिणींना पेढे भरवित आनंद व्यक्त केला. निकालाची टक्केवारी यंदा काहीसी कमी झाली. छत्रपती संभाजीनगर विभागातील छत्रपती संभाजीनगर, बीड, जालना, हिंगोली, परभणी असे पाच जिल्ह्ये येतात. पाच जिल्ह्यातून १ लाख ८१ हजार ७५९ विद्यार्थ्यांनी परीक्षेसाठी नोंदणी केली होती. त्यापैकी १ लाख ७९ हजार ९०४ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली. यापैकी १ लाख ६५ हजार ९६१ विद्यार्थी उत्तीर्ण झाले.उत्तीर्णतेची टक्केवारी ९२.२४ एवढी आहे. मागील वर्षी विभागाचा

पान नं२

# जिल्हाधिकारी डॉ. इंदु राणी जाखड यांच्या निर्देशानुसार वादळामुळे नुकसान झालेल्या डहाणू तालुक्यातील धाकटी डहाणू येथील नुकसानग्रस्त भागाची पाहणी



डहाणू तालुक्यातील धाकटी डहाणू येथे दि.६ मे,२०२५ रोजी झालेल्या वादळामुळे ४० ते ५० बोटी व १० ते १२ घरांचे नुकसान झाले असून जिल्हाधिकारी डॉ.इंदू राणी जाखड यांच्या निर्देशानुसार व मार्गदर्शनानुसार उपजिल्हाधिकारी व उपविभागीय अधिकारी,डहाणू महेश सागर, दिनेश पाटील, उपआयुक्त मत्स्यव्यवसाय विभाग व डहाणू तालुक्याचे तहसिलदार सुनिल कोळी यांनी नुकसानग्रस्त भागाला भेट देऊन नुकसानीचा आढावा घेतला व नुकसान झालेल्या मच्छिमार बांधवांची भेट घेऊन त्यांच्या झालेल्या नुकसानीची पाहणी केली.

तसेच उपजिल्हाधिकारी व उपविभगीय अधिकारी,डहाणू महेश सागर यांनी शासनातर्फे नियमानुसार योग्यती मदत देण्यात येईल असे नुकसानग्रस्त बांधवांना सांगितले.

संबंधित नुकसानीचे पंचनामे सहायक आयुक्त मत्स्यव्यवसाय विभाग व महसूल प्रशासनाचे कर्मचारी यांच्या माध्यमातून करण्यात येत आहे.

# कुंडलीत मृत्यूयोग आणि खालच्या जातीचा ठपका लग्नाला नकार दिल्याने तरुणीची आत्महत्या!




वसई (प्रतिनिधी):- 'तुझ्या कुंडलीत मृत्यूयोग आहे आणि तू खालच्या जातीची आहेस' असे सांगून लग्नाला नकार दिल्याने २० वर्षीय तरुणीने आत्महत्या केली आहे. याप्रकरणी वसई पोलिसांनी मुलीचा प्रियकर आणि त्याच्या वडिलांना आत्महत्येस प्रवृत्त केल्याप्रकरणी गुन्हा दाखल केला आहे.

पीडित तरूणी रेवती निळे (२०) ही वसईत राहत असून महाविद्यालयीन शिक्षण घेत होती. तिचे आयुष राणा (२१) या तरूणासोबत मागील ४ वर्षांपासून प्रेमसंबंध होते. आयुष तिच्याच वर्गात शिकत होता. तो वसईच्या भास्कर आळीतील नादब्रम्ह सोसायटीत रहातो. या काळात लग्नाचे आमिष दाखवून आयुषने वारंवार तिच्याशी शरीरसंबंध प्रस्थापित केले होते. मात्र नंतर लग्नाबाबत विचारणा केल्यानंतर तो तिला टाळू लागला. त्याने रेवतीचा नंबरही ब्लॉक करून टाकला होता. त्यामुळे ती नैराश्यात होती. याबाबत तिने राणाच्या पालकांशी संपर्क केला. त्यावेळी त्यांनी हात वर केले. तुझ्या कुंडलीत मृत्यूयोग आहे तसेच तू खालच्या जातीची असल्याने माझ्या मुलाचे लग्न तुझ्याशी लावून देऊ शकत नाही असे आयुषच्या वडिल अजय राणा (५१) यांनी सांगितले. त्यामुळे २७ एप्रिल २०२५ रोजी तिने राहत्या घरात उंदीर मारण्याचे औषध प्राशन करून आत्महत्या केली होती. याप्रकरणी वसई पोलिसांनी अजय राणा आणि आयुष राणा या पिता पुत्रांना रेवती निळे हिला आत्महत्येस प्रवृत्त केल्याप्रकरणी भारतीय न्याय संहितेच्या कलम १०८, ३(५) अन्वये गुन्हा दाखल केला आहे.

जादू टोण्याचा आरोप

आरोपी आयुष राणाचे वडील अजय राणा (५१) हे तांत्रिक आहे. ते रेवतीवर विविध धार्मिक विधी करत होते. तिच्या हाताला बांधण्यासाठी गंडा दिला होता. अनेकदा तिच्या बॅगेत ठेवण्यासाठी राख देत असे. असे केल्याने तुझ्यातील दोष दूर होईल आणि तुझे लग्न लावून देता येईल असे राणा सांगत होता, असा जबाब मयत रेवतीचा भाऊ दिनेश काळे याने वसई पोलिसांना दिला आहे. राणा कुटुंबिय जादूटोणा करणारे असून त्यांच्याविरोधात अंधश्रध्दा निर्मूलन कायद्याअंतर्गतही गुन्हा दाखल करायला हवा, अशी मागणी त्यांनी केली आहे.




**काही महिन्यांपूर्वी वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग (ड) चे सहआयुक्त मोहन शंखे यांना निलंबित करण्यात आले. आपल्या सर्वांना माहित आहे की मोहन शंखे यांना का निलंबित करण्यात आले.. ऑडिओ क्लिप मित्रांनो, वसई विरार शहर महानगरपालिका आयुक्त साहेबांना माझे फक्त २ प्रश्न आहेत?**

(( १ )) मोहन शंखे यांना निलंबित केल्यानंतर, वसई विरार शहर महानगरपालिकेचे आयुक्त श्री. अनिल पवार साहेबांनी निलंबित अधिकारी मोहन शंखे यांनी केलेल्या बेकायदेशीर बांधकामाची भ्रष्टाचाराची चौकशी करणारी कोणतीही समिती स्थापन केली होती का? किंवा चौकशी पूर्ण झाली आहे आणि त्याचा अहवाल आयुक्त साहेबांना देण्यात आला आहे का? किंवा चौकशी अजूनही सुरू आहे का?

(( २ ))मोहन शंखे यांनी बेकायदेशीर बांधकामाच्या नावाखाली कोट्यवधींचा भ्रष्टाचार केला आहे. त्या भ्रष्टाचाराची चौकशी कधी होईल की नाही? खरोखरच काही समिती स्थापन झाली आहे का? की काही महिन्यांनी वसई विरार शहर महानगरपालिका आयुक्त स्वतः मोहन शंखे यांना क्लीन चिट देतील का?

## युवाशक्ती एक्सप्रेस कार्यालय- ९८९०८७९७५७

वृत्तपत्रात प्रसिद्ध होणारा मजकूर आलेल्या कागदपत्रांवर आधारित असतो. त्यामुळे प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत कोणाला आक्षेप असल्यास संबंधितांनी योग्य त्या कागदपत्रांसह **युवाशक्ती एक्सप्रेस** कार्यालयाशी संपर्क साधावा. सदर पुरावे योग्य असल्यास संबंधित बातमी बाबतचा खुलासा प्रसिद्ध केला जाईल. या पत्रात प्रसिद्ध होणा-या मजकुराला मुद्रक स्थळ जबाबदार राहणार नाही.

साप्ताहिक युवाशक्ती एक्सप्रेस मते प्रसिद्ध होणा-या कोणत्याही प्रकारच्या जाहिरातीबाबत कुठल्याही प्रकारचा वाद उद्भवल्यास त्याला युवाशक्ती एक्सप्रेस व्यवस्थापन जबाबदार राहणार नाही याची सर्वांनी नोंद घ्यावी.

साप्ताहिक युवाशक्ती एक्सप्रेस वृत्त प्रसिद्धी किंवा अन्य कोणत्याही तत्सम कामासाठी संपादकाशी संपर्क साधायचा असल्यास संबंधितांनी दूरध्वनी कमांक ९८९०८७९७५७ वर संपर्क साधावा.

या नोटीसी द्वारे कळविण्यात येते कि साप्ताहिक युवाशक्ती एक्सप्रेस वर्तमानपत्रात प्रसिद्ध होणा-या जाहिराती सर्व प्रकारच्या नोटीसी याच्याशी आमचा काहीही संबंध नाही. संबंधित आणि संबंधित व्यक्तीशी परस्पर संबंध साधून त्याबाबत खात्री करावी. साप्ताहिक युवाशक्ती एक्सप्रेस वर्तमानपत्र व व्यवस्थापन याला कोणत्याही प्रकारे जबाबदार राहणार नाही.

संपादक..

**Printed,Published And Owned Tushar Rajratna Gaikwad,printed At Vava ArtsB/8 Dronagiri CHS.,Tanki Road Tulinj (E) Tal-Vasai 401209,Published From Room No.10 Kadarbhai Chawl Sarvoday Vasahat Tnki Road Nallasopara (E) Tal--Vasai Dist-Palghar-401209.Editor-tushar Rajratna Gaikwad RNI NO.MAHMAR/2016/72543. Mobile-9960144348,9890879757,yuvashaktiexpress123@gmail.com www.yuvashaktiexpress.in**

**हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक आणि संपादक म्हणून तुषार राजरत्न गायकवाड रु. नं. १०, कादरभाई चाळ, सर्वोदय वसाहत, आंबेडकर नगर, टाकीरोड, नालासोपारा (पुर्व), ४०१२०९. ता. वसई, जि. पालघर, येथे प्रकाशित होऊन ९८९०८७९७५७ मे. बाबा आर्टस् बी.०८, मथुरा नगर, द्रोणगिरी अपार्टमेंट, टाकी रोड, साई बाबा मंदिर जवळ, नालासोपारा (पुर्व), ४०१२०९ जि. पालघर, महाराष्ट्र येथे मुद्रित करण्यात आले. मोबाईल नं. ९९६०१४४३४८**

**या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (सर्व वाद वसई न्यायालयाच्या कक्षेत)** Email:yuvashaktiexpress123@gmail.com www.yuvashaktiexpress.in